क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१६/मो.पोनि./०८/२०१६
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :-१० /०५/२०१६.

वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०१४, व
२) महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश-२०१५, दि.१६/०२/२०१५.

आदेश :

उपरोक्त संदर्भात नमूद अध्यादेशातील कलम २२ न (१) (क) (अ) अन्वये विहीत केलेल्या तरतुदींनुसार मोटार परिवहन विभागातील पोलीस निरीक्षक दर्जापर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदलीकरिता सक्षम प्राधिकारी, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२, यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेनुसार **खालील विवरणपत्रांतील मोटार परिवहन विभागातील पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या ह्या, विहित कालावधी पूर्ण झाल्याने/ प्रशासकीय कारणांस्तव, व विनंतीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहेत:-**

| अ.क्र. | पोलीस निरीक्षकाचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | राजेंद्र रामचंद्र गायकवाड | नाशिक शहर | सांगली | विहित कालावधी पूर्ण झाल्याने , प्रशासकीय कारणांस्तव |
| २ | आबा रंभाजी चेमटे | पुणे ग्रामीण | कर्मशाळा, पुणे | विहित कालावधी पूर्ण झाल्याने, प्रशासकीय कारणांस्तव |
| ३ | सुनिल बाळाप्पा पालकर | सांगली | चालक प्रशिक्षण केंद्र, पुणे. | विहित कालावधी पूर्ण झाल्याने, प्रशासकीय कारणांस्तव |
| ४ | श्रीमंत ज्ञानु आकळे | नाशिक ग्रामीण | पुणे ग्रामीण | विनंतीवरुन |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या आदेशांची प्रत, आणि बदली ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आलेल्या आदेशांची प्रत, उक्त पोलीस निरीक्षकांना व्यक्तिश: अदा करुन, त्या आदेशांच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून, त्या पोंच या कार्यालयास सत्वर सादर कराव्यात.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी **उपरोक्त बदली आदेशाधिन असलेल्या उक्त पोलीस निरीक्षकांना बदलीवर सोडताना पर्यायी/ बदलीवर येणा-या पोलीस निरीक्षकांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.** तसेच, सदर पोलीस निरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक संबंधीत घटक प्रमुखांनी, **या कार्यालयास दिनांक ३१/०५/२०१६ पुर्वी (कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन)** निश्चितपणे कळवावा.

४. संबंधीत घटक प्रमुखांनी, **त्यांच्या घटकात बदलून येणारे जे पोलीस निरीक्षक या आदेशांनुसार बदलीवर नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांची नावे** कृपया या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन**

फॅक्सद्वारे कळवावीत. तसेच, **त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे पोलीस निरीक्षक बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील, अशा पोलीस निरीक्षकांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात यावे,** आणि त्याबाबतचा स्वतंत्र अहवालदेखील या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे सत्वर सादर करावा. तसेच, संबंधीत घटक प्रमुखांनी **अशा संबंधीत पोलीस निरीक्षकांविरुध्द या कार्यालयाचे पत्र क्र. २/५५/०७, दि. १६/०९/१९८३, दि. ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१, तसेच परिपत्रक क्र.पोमसं/३/५५०७/६/९, दि. १३/०२/१९९७ मधील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, व तसाही अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन सत्वर सादर करावा.**

५. बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबधीत घटक प्रमुखांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

६. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

**प्रवीण दीक्षित**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, नाशिक शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे.
पोलीस अधिक्षक, पुणे (ग्रा.)/ सांगली/ नाशिक (ग्रा.)
पोलीस मध्यवर्ती मोटार परिवहन कर्मशाळा, पुणे/ चालक प्रशिक्षण केंद्र, पुणे.

**प्रत सविनय सादर :-**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२

***प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-***

महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर. (सस्नेह)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
कोषाधिकारी पुणे ग्रा./ सांगली/ नाशिक
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई (सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

प्रत :-

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, ५-अ, ९, ११, ११-अ, १४, २८, ३६ व ४०.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता